स्थायी समितीच्या सोमवार दिनांक 27–08–2012 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 9. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 10. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 11. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 12. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 13. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 2. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 3. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड.सिद्यीकी, उप निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 120 :– शासन निर्णय क्र.नामपा–2308–680–प्र.क्र.358–नवि 26, दिनांक 01.04.2009 व शासन निर्णय क्रमांक नामपा–2308–680–प्र.क्र.358–नवि– 26 दिनांक 08.09.2010 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्य क्रमशः नागपूर शहर पाणीपट्टी दर मुल्यांकन वसुली उपविधी 2009 व दुरुस्ती उपविधी 2010 च्या कलम 56(ब) अन्वये प्राप्त अधिकरांतर्गत आयुक्त,म.न.पा.यांनी सोबत सहपत्र– 1 वर जोडलेल्या आदेश क्रमांक एम.सी./206,दि.31.3.2012 अन्वये मंजुर केलेले व दिनांक 01.04.2012 पासून लागु केलेल्या सुधारित दरांची नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून सुधारित दर दिनांक 01.04.2012 ला जे लागु करण्यांत आले त्याची कारण मिमांसा कार्यालयाने करावी जेणे करुन शहरातील उपभोक्ता हे सभ्रमांत पडू नये या दृष्टीने सादर करावा. तसेच नागपूर महानगरपालिकेच्या शहर पाणी पट्टीचे दर व महाराष्ट्रातील इतर महानगरपालिका व इतर नगरपालिका यांचा तूलनात्मक दराचा अहवाल सादर करण्यांत यावा. जेणे करुन शहरातील उपभोक्त्यांचा संभ्रम दूर होईल. यास्तव विषय कार्यालस परत करण्यांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 121 :– नागपूर शहरातील सोनेगाव तलावाखालील अंदाजीत 15.21 हेक्टर जागेचे अधिग्रहण करण्यास्तव अंदाजे 5.13 कोटी चे खर्चास मान्यता देण्याचा तथा या रक्कमेची तरतुद मनपाचे सन 2012 चे आयव्यकात करण्याचा तसेच भुसंपादन अधिनियम 1894 अन्वये या जागेचे संपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे कडे पाठविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून भूसंपादन अधिनियमाअन्वये प्रस्तावित जागेचे भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कडे पाठविण्यास तसेच मा. जिल्हाधिकारी यांनी 15.21 हेक्टर जागेच्या अधिग्रहणाची किंमत निर्धारीत केल्यावर परत स्थायी समितीची मंजूरी घेण्यांत यावी यासह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 122 :– नागपूर महानगरपालिका शहरबस सेवेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना खाजगी कंत्राटदारामार्फत निर्गमित केलेल्या सवलत पासेसची सन 2007 ते मार्च 2012 पावेतो प्रलंबित राशी रु. 50,45,270/– ची प्रतिपुर्ती करण्यास कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्याचा विषय विचारात घेणे तसेच पुढील कालावधीसाठी याच बाबीसाठी महानगरपालिकेचे वार्षिक अंदाजपत्रकात आवश्यक त्या राशीची तरतुद ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एकुण राशीच्या 10 प्रतिशत राशी रोखुन उर्वरीत राशीचे भूगतानाची प्रतिपूर्ती करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 123 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /– हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /– दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर